ज्ञानगंगा घरोघरी

# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ

(नँक मानांकित 'अ ' श्रेणी )

'ज्ञानगंगोत्री', गोवर्धन, गंगापूर धरणाजवळ, नाशिक -४२२ २२२

## शिक्षणशास्त्र विद्याशाखा
## एम. ए. (शिक्षणशास्त्र) शिक्षणक्रम (२०२४-२०२६) (M-83)
## माहितीपुस्तिका

**शैक्षणिक वर्ष : २०२४-२६**

## विद्यापीठ गीत



एक प्रतिज्ञा असे आमुची ज्ञानाची साधना ।
चिरंतन ज्ञानाची साधना ।
ज्ञान हेच संजीवन साऱ्या जगताच्या जीवना ॥ धृ ॥

ज्योत जागवू सुजाणतेची सकलांच्या अंतरी ।
तीच निवारील पटल तमाचे प्रभात सूर्यापरी ।
ज्ञानच देउळ, ज्ञानच दैवत, प्रगतीच्या पूजना ॥ 1 ॥

नव्या युगाचा नव्या जगाचा ज्ञान धर्म आहे ।
त्यातच अमुच्या उजळ उद्याचे आश्वासन राहे ।
मुक्त करिल तो परंपरेच्या बंदिघरातुन मना ॥ 2 ॥

हाच मंत्र नेईल आम्हाला दिव्य भविष्याकडे ।
न्यायनीतीचे पाऊल जेथे भेदाशी ना अडे ।
जे जे मंगल पावन त्याची जेथे आराधना ॥ 3 ॥

\- कुसुमाग्रज

**निर्मिती**
श्री. विलास बधान
प्रमुख (प्र.), ग्रंथनिर्मिती केंद्र, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक 422 222

© २०२४, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

प्रथम प्रकाशन : जून २०२४
प्रकाशक : श्री. दिलीप भरड, कुलसचिव , यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक 422 222

# शिक्षणशास्त्र विद्याशाखा : एम. ए. (शिक्षणशास्त्र) शिक्षणक्रम (M-83) माहितीपुस्तिका

**अनुक्रमणिका**


१. विद्याशाखेचा परिचय ---------------------------------------------------------------------------------------------४

२. एम. ए. (शिक्षणशास्त्र) शिक्षणक्रम (M-83)शिक्षणक्रमाविषयी ---------------------------------------------------५

३. प्रवेश-प्रक्रिया-------------------------------------------------------------------------------------------------------६

४. शिक्षणक्रमाची संरचना/आकृतिबंध ---------------------------------------------------------------------------८

५. मूल्यमापन प्रक्रिया ---------------------------------------------------------------------------------------------१०

६. संकीर्ण माहिती / सूचना ---------------------------------------------------------------------------------------१२

७. परिशिष्टे एम. ए. (शिक्षणशास्त्र) एम. एड. ला समकक्षतेबाबत---------------------------------------------------१४


❖ **Academic Bank of Credits-ID तयार करण्याबाबतची सूचना**

सर्व शिक्षणक्रमाच्या विद्यार्थी मित्रांनो,

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 नुसार आपणास Academic Bank of Credits – ID तयार करणे अनिवार्य आहे. आपण प्राप्त केलेली प्रमाणपत्रे, पदविका, पदवीची माहिती Digilocker (ABC-NAD) वर भरावी लागणार आहे. त्याशिवाय इतर अभ्यासक्रमासाठी क्रेडिट ट्रान्सफर करता येणार नाही. आपणास Academic Bank of Credits - ID नोंदणी http://www.abc.gov.in या पोर्टलवर करता येईल. किंवा आपल्या विद्यापीठाच्या www.ycmou.ac.in या वेबसाईटला भेट द्या. या वेबसाईटवरील Student Zone या बटणाला क्लिक करा. यातील Academic Bank of Credits वर क्लिक केल्यानंतर Academic Bank of Credits - ID तयार करण्यासंबंधी माहिती व PPT सादरीकरण आपणासाठी वेबसाईटवर उपलññब्ध केलेले आहे.

❖ शिक्षणक्रमाला 20 पेक्षा कमी प्रवेश झाल्यास असा शिक्षणक्रम सन 2024 या शैक्षणिक वर्षासाठी स्थगित ठेवण्याचा अधिकार विद्यापीठाकडे असेल. ज्या विद्यार्थ्यांनी सदर शिक्षणक्रमास प्रवेश घेतलेला असल्यास अशा विद्यार्थ्यांना त्यांचे संपूर्ण शुल्क परत देण्यात येईल.

## १. विद्याशाखेचा परिचय

विद्यापीठात एकूण आठ विद्याशाखा आहेत. विद्यापीठाच्या स्थापनेनंतर अवघ्या एक वर्षात शिक्षणशास्त्र विद्याशाखेची स्थापना झाली. त्यानंतर शिक्षणशास्त्र विद्याशाखेने आपले नाव संपूर्ण महाराष्ट्रात उज्ज्वल करण्याच्या दृष्टीने पावले उचलण्यास सुरुवात केली. आज संपूर्ण महाराष्ट्र शिक्षणशास्त्र विद्याशाखेकडे नेतृत्वाच्या दृष्टीने पाहतो. अद्ययावतता, गतिमानता आणि नवोपक्रमांचे स्वागत ही या विद्याशाखेची वैशिष्ट्ये आहेत.

शिक्षणशास्त्र विद्याशाखेने आपल्या कार्यास सुनिश्चितरित्या आणि गुणवत्ता राहावी या दृष्टीने विद्याशाखेचे गुणवत्ता धोरण, व्रतविधान आणि उद्दिष्टे निश्चित केली. त्या अनुषंगाने विद्याशाखेत प्रमाणपत्रापासून संशोधनापर्यंत अनेक शिक्षणक्रम टप्प्या-टप्प्याने सुरू झाले. विद्याशाखेच्या स्थापनेनंतर अवघ्या एक वर्षात (१९९१) दूरशिक्षणाद्वारे बी. एड. शिक्षणक्रम सुरू करणारे संपूर्ण भारतातील हे पहिले मुक्त विद्यापीठ होय. त्यानंतर ह्या विद्याशाखेने अवघ्या दहा-पंधरा वर्षांत एम. फिल. शिक्षणशास्त्र (२००७), एम. फिल. शारीरिक शिक्षण (२००७), एम. एड. (१९९४), एम. ए. शिक्षणशास्त्र (२००७) असे उच्च पदवी शिक्षणक्रम सुरू केले. २०१५, २०१९ या शैक्षणिक वर्षांमध्ये पीएच.डी. शिक्षणशास्त्र आणि दूरशिक्षण या दोन क्षेत्रांमध्ये विद्यावाचस्पती Ph.D पदवी राबविण्यात आली. एवढेच नव्हे तर विद्यापीठाच्या ध्येयास सुसंगत असे तळागाळातील लोकांपर्यंत पोहचवणारे स्वयं-साहाय्य गट प्रेरक/प्रेरिका शिक्षणक्रम (२००२), बालसेविका (२००२), मूल्य शिक्षण, आशययुक्त अध्यापन पद्धती, शालेय व्यवहारांसाठी माहिती संप्रेषण तंत्रज्ञान, घरकामगार कौशल्य विकास यांसारखे प्रमाणपत्र शिक्षणक्रमही कार्यान्वित केले. शिक्षणाची गुणवत्ता वाढावी यासाठी मुख्याध्यापकांसाठी शालेय व्यवस्थापन पदविका तर माध्यमिक शिक्षकांसाठी सेवांतर्गत प्रशिक्षणांचे आयोजन केले. 'ज्ञानगंगा घरोघरी' पोहचवण्याच्या दृष्टीने संपूर्ण महाराष्ट्रात प्रत्येक जिल्ह्यात अभ्यासकेंद्रे स्थापन केली.

मुक्त विद्यापीठाची शिक्षणपद्धती दूरशिक्षणाची असते, तर ह्या विद्याशाखेत प्रवेश घेणारे विद्यार्थी सेवांतर्गत असतात. ह्याचा विचार करून शिक्षणक्रमांची व त्यातील प्रात्यक्षिकांची रचना केली. प्रत्येक प्राप्त अनुभव वास्तविक स्तरावर पडताळून पाहता यावा यासाठी विशेष प्रात्यक्षिकांचे नियोजन केले. त्या अनुषंगाने महाराष्ट्रातील सर्व तज्ज्ञांच्या मदतीने मुद्रित-अमुद्रित साहित्य तयार केले. ह्या विद्याशाखेतील शिक्षणक्रम व्यावसायिक असतात. त्याचा विचार करता अभ्यासकेंद्रांवर शिक्षणक्रमातील विशिष्ट प्रात्यक्षिके मार्गदर्शनाखालीच करता यावी, त्याचा सराव व्हावा या दृष्टीने संपर्कसत्रांचे आयोजन केले.

मुक्त विद्यापीठातील शिक्षणशास्त्र विद्याशाखा अनेकविध पुरस्कारांनी विभूषित आहे हे सांगण्यास आम्हाला आनंद होतो. आंतरराष्ट्रीय पुरस्कारात डॉ. अनंत जोशी, संचालक, शिक्षणशास्त्र विद्याशाखा यांना COL कडून मिळालेला जीवनगौरव पुरस्कार, श्रीमती वानखेडे स्वाती, बी. एड., एम. एड. ची विद्यार्थिनी ह्यांना COL कडून मिळालेला Award of Excellence for Distance Education ह्यांचा समावेश होतो. इतर विद्यार्थी आणि विद्यार्थिनींनी राष्ट्रीय आणि राज्य स्तरावरील पुरस्कार मिळविले आहेत. तसेच येथील प्राध्यापक वर्गासही राष्ट्रीय व राज्य पातळीवरील वैयक्तिक पुरस्कार मिळालेले आहेत.

## २. एम. ए. (शिक्षणशास्त्र) (M83) शिक्षणक्रमाविषयी

शिक्षणशास्त्र हे सामाजिकशास्त्र आहे. या शास्त्रातही पदव्युत्तर पदवी एम.ए. शिक्षणशास्त्र शिक्षणक्रम असावा म्हणून विद्यापीठ अनुदान आयोगाने सन २००१ साली त्याचा अभ्यासक्रम आकृतिबंध (Curriculum) प्रसिद्ध केला व त्यात एम.ए. शिक्षणशास्त्र यास पदव्युत्तर पदवीचा विषय म्हणून मान्यता दिलेली आहे. **NEP 2020 च्या मार्गदर्शक तत्त्वानुसार सदर शिक्षणक्रमाची रचना करण्यात आलेली आहे.**

एम.ए. शिक्षणशास्त्र निष्णात शिक्षणक्रमास प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी शिक्षणातील विविध घटकांचा अभ्यास करावा असे अपेक्षित आहे. विविध पातळींवरील सेवांतर्गत प्रशिक्षण, धोरण विकसन, चिकित्सा, शिक्षण प्रणालीचे मूल्यमापन यासाठी निष्णात व्यक्तींची आवश्यकता आहे. काळानुरुप शिक्षण प्रक्रियेत होत गेलेले बदल अभ्यासणे गरजेचे आहे. शिक्षणशास्त्र ही विद्याशाखा आंतरज्ञानशाखीय (Multi- disciplinary) आहे. त्यामुळे तत्त्वज्ञान, समाजशास्त्र, मानसशास्त्र, इतिहास, व्यवस्थापनशास्त्र अशा अनेकविध विद्याशाखांमधून विविध तत्त्व, प्रणाली शिक्षणास मिळालेल्या आहे. या सर्वांचा अभ्यास एम.ए. शिक्षणशास्त्र निष्णात व्यक्तींनी करणे गरजेचे आहे.

शिवाजी विद्यापीठात, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात पदवी पातळीवर बी.ए. शिक्षणशास्त्र राबविण्यात येत आहे. तर ओरिसा, आसाम आणि मुंबई विद्यापीठानेही एम.ए. शिक्षणशास्त्र हा शिक्षणक्रम सुरू केलेला आहे.

विद्यापीठ अनुदान आयोगाने सुचविलेल्या एम.ए. शिक्षणशास्त्र ह्या पदवीची दखल नॅशनल कौन्सिल फॉर टीचर एज्युकेशन (एन.सी.टी.ई.) या संस्थेनेही घेतलेली असून डी.एड./बी.एड. महाविद्यालयात शिकविण्यासाठी एम.एड./एम.ए. शिक्षणशास्त्रास मान्यता दिलेली आहे. (नियम क्र. २९/११/१९९५ (Annex-A) संपूर्ण महाराष्ट्रातील विविध स्तरांवरील कार्यरत शिक्षकांना दैनंदिन कार्याशी निगडीत पदव्युतर पदवी घेण्याच्या दृष्टीने मुक्त विद्यापीठाने उचललेले हे एक नवे पाऊल आहे.

### २.१ उद्दिष्टे

- पाश्चात्त्य आणि भारतीय तत्त्वज्ञानाचा शिक्षणक्षेत्रातील सहभाग स्पष्ट करणे.
- सामाजिक बदलाचा शिक्षणातील सहभागावर झालेला परिणाम स्पष्ट करणे.
- मानसशास्त्रातील विविध शाखांमधून शिक्षणशास्त्र कसे विकसित झाले ह्याचे आकलन वृद्धिंगत करणे.
- शैक्षणिक मानसशास्त्र, शिक्षणाचे तत्त्वज्ञान, शिक्षणाचे समाजशास्त्र, मूल्यमापन इत्यादी क्षेत्रांतील ज्ञानपाळती उंचावण्यास मदत करणे.
- शैक्षणिक संशोधनासाठी आवश्यक ते ज्ञान, दृष्टी, कौशल्ये विकसित करणे.
- शैक्षणिक नियोजन, प्रशासन, निरंतर व अनौपचारिक शिक्षण, शैक्षणिक तंत्रविज्ञान, प्रौढ शिक्षण या क्षेत्रांसाठी आवश्यक ते मनुष्यबळ निर्माण करणे.
- पर्यावरण शिक्षण, मानवी हक्क, जीवन कौशल्य, समावेशित शिक्षण याबाबतचे आकलन वृद्धिंगत करणे.
- शिक्षणात ICT वापराबाबतची क्षमता विकसित करणे.
- शैक्षणिक उद्योजकता कौशल्ये विकसित करणे.
- विशेष गरजा असणाऱ्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन व समुपदेशन करण्याची क्षमता विकसित करणे.

## ३. प्रवेश-प्रक्रिया

### ३.१ प्रवेश-पात्रता

(१) कोणत्याही मान्यताप्राप्त विद्यापीठाची **शिक्षणशास्त्र** विषयातील बी.ए. पदवी उत्तीर्ण

किंवा

(२) यशस्वीरीत्या पूर्ण केलेल्या पदवीच्या किमान व्दितीय वर्षपर्यंत **शिक्षणशास्त्र** विषय घेतलेले

किंवा

(३) कोणत्याही मान्यताप्राप्त विद्यापीठाची शिक्षणशास्त्र पदवी (बी.एड.) उत्तीर्ण झालेले उमेदवार

किंवा

(४) बी.ए. बी.एड. (एकात्मिक) उत्तीर्ण किंवा बी. एस्सी. बी.एड. (एकात्मिक) उत्तीर्ण किंवा बी. कॉम. बी.एड. (एकात्मिक)उत्तीर्ण

किंवा

(५) बी.एड. (विशेष शिक्षण) उत्तीर्ण

किंवा

(६) बी.पीएड. शारीरिक शिक्षण उत्तीर्ण

किंवा

(७) B.El.Ed

किंवा

(८) कोणत्याही विषयातील B.A. पदवीधारक.

(९) आर्ट मास्टर (A.M.) बी. एड. समकक्ष

(१०) ललित कला पदवीधर व्यक्ती (B.F.A.)

(११) खुल्या वर्गासाठी ५०% आणि मागासवर्गीयांसाठी ४५% गुण आवश्यक

### ३.२ एकूण जागा

प्रत्येक अभ्यासकेंद्रावर ५० जागा आहेत. प्रथम प्रवेश घेणाऱ्यास प्रथम प्राधान्य देण्यात येईल.

### ३.३ शिक्षणक्रमाची संरचना

| | |
|---|---|
| (अ) अभ्यास विषय | : एकूण २५ सैद्धांतिक विषय |
| (आ) संशोधन | : १० श्रेयांक |
| (इ) एकूण श्रेयांक | : ८८ |
| (ई) क्षेत्रीय कार्य आणि आंतरवासिता | : ०४ श्रेयांक |
| (उ) किमान कालावधी | : २४ महिने |
| (ऊ) एकूण अध्ययन तास | : ३०८० घड्याळी तास (अंदाजे) |

ह्या शिक्षणक्रमाचा कालावधी २ वर्षांचा असला तरी विद्यार्थी त्याच्या सोईप्रमाणे प्रवेश घेतल्यापासून ४ वर्षांत हा शिक्षणक्रम पूर्ण करू शकेल.

### ३.४ शिक्षणक्रम शुल्क

एम.ए. (शिक्षणशास्त्र) शिक्षणक्रमाच्या प्रवेशासाठीचे शुल्क पुढीलप्रमाणे आहे.

**एम.ए. शिक्षणशास्त्र शिक्षणक्रम शुल्क (M83)**

| Sr. No | शिक्षणक्रम शुल्क | प्रथम वर्ष शुल्क | द्वितीय वर्ष शुल्क |
|---|---|---|---|
| **Part : A** | | | |
| 1 | Registration Fees (नोंदणी शुल्क) | 200 | 200 |
| 2 | Eligibility Fee (पात्रता शुल्क) | 100 | - |
| 3 | Identity Card Fee (ओळखपत्र शुल्क) | 10 | - |
| 4 | Prospectus Fee (माहितीपुस्तिका शुल्क) | 50 | 50 |
| 5 | E-Suvidha/E-Services Fee (ई-सुविधा शुल्क) | 60 | 60 |
| 6 | Library Fee (ग्रंथालय शुल्क) | 10 | 10 |
| 7 | Chalncellor's Office Events Fees (कुलपती कार्यालय कार्यक्रम शुल्क) | 38 | 38 |
| 8 | Sports Fees (क्रीडा शुल्क) | 50 | 50 |
| 9 | DSW Fees (बहिस्थ विद्यार्थी कल्याण शुल्क) | 50 | 50 |
| 10 | Disastar Management Fees (आपत्ती व्यवस्थापन शुल्क) | 10 | 10 |
| 11 | NSS Fees (एन.एस.एस शुल्क) | 10 | 10 |
| 12 | Alumni Fees (ॲल्युमनी शुल्क) | - | 10 |
| 13 | Sanvad Fees (संवाद पत्रिका शुल्क) | 10 | 10 |
| 14 | Graduation/Convocation Fees (पदविका समारंभ शुल्क) | - | 450 |
| 15 | Student Insurance Fees (विद्यार्थी विमा शुल्क) | 10 | 10 |
| | **Total :** (प्रथम वर्ष + द्वितीय वर्ष) | 608 | 958 |
| **Part : B** | | | |
| 16 | **Tuition Fees**<br>• प्रथम वर्ष विद्यापीठ शुल्क आणि अभ्यासकेंद्र शुल्क (रु. 6472 + रु. 4500)<br>• द्वितीय वर्ष विद्यापीठ शुल्क आणि अभ्यासकेंद्र शुल्क (रु. 6472 + रु. 4500) | 10972 | 10972 |
| 17 | Exam Fees (परीक्षा शुल्क) (प्रथम वर्ष रु. 1980 + द्वितीय वर्ष रु. 1620) | 1980 | 1620 |
| | **Total** : Part A + Part B (प्रथम वर्ष + द्वितीय वर्ष) | 13560 | 13550 |

विद्यार्थ्यांचा प्रवेश हा प्रतिवर्षी होणार आहे. त्यामुळे विद्यार्थ्याने प्रतिवर्षी शुल्क स्वतंत्रपणे भरावयाचे आहे.

(१) शिक्षणक्रम शुल्क हे विद्यापीठाने निर्धारित केलेल्या ऑनलाईन पद्धतीने भरावयाचे आहे.

(२) विद्यापीठाकडून अभ्यासकेंद्राचे शुल्क पाठविण्यात येणार आहे. त्यामुळे अभ्यासकेंद्रावर कोणतेही शुल्क भरू नये. अभ्यासकेंद्राने जादा शुल्काची मागणी केल्यास तातडीने विद्यापीठाकडे लेखी संपर्क साधावा.

**३.५ कालावधी**

एम.ए. (शिक्षणशास्त्र) शिक्षणक्रमाची किमान कालमर्यादा चोवीस महिन्यांची आहे. मूळ शुल्कामध्येच जास्तीत जास्त चार वर्षे नोंदणी राहू शकेल. या कालावधीत विद्यार्थ्याला अंतिम परीक्षेसाठी ८ संधी उपलब्ध होतील. चार वर्षांनंतर नोंदणी आपोआप रद्द होईल.

**३.६ माध्यम**

या शिक्षणक्रमासाठी पुरविण्यात येणारे सर्व अध्ययन - साहित्य मराठी माध्यमातून असेल. मात्र उत्तरे लिहिण्यासाठी पूर्वपरवानगीने हिंदी वा इंग्रजी यांपैकी एका माध्यमाचा वापर करता येईल. परीक्षेच्या प्रश्नपत्रिका मात्र मराठी व इंग्रजीतच उपलब्ध होतील. त्यातील मराठी प्रश्नपत्रिका कायद्यानुसार वैध मानण्यात येतील.

**३.७ अध्ययन साहित्य**

सन २०२३-२५ तुकडीपासून NEP 2020 च्या आधारे नवीन अभ्यासक्रम रचना करण्यात आलेली आहे. त्यामुळे मुद्रित/ ऑनलाईन अध्ययन साहित्य उपलब्ध होईल.

## ४ शिक्षणक्रमाची संरचना / आकृतीबंध

या शिक्षणक्रमाचे १) अनिवार्य अभ्यासक्रम, २) वैकल्पिक अभ्यासक्रम, ३) संशोधन पद्धती अभ्यासक्रम, ४) संशोधन कार्य, ५) क्षेत्रीय कार्य आणि आंतरवासिता असे पाच भाग पडतात.

### एम. ए. (शिक्षणशास्त्र) शिक्षणक्रम अभ्यासक्रम यादी

| क्र. | अभ्यासक्रमाचे नाव | अभ्यासक्रम संकेतांक |
|---|---|---|
| | **सत्र - १ (SEM - I) (Mandatory)** | |
| १. | प्रगत शैक्षणिक तत्त्वज्ञान (Advance Educational Philosophy) - 4 Credit | EDU505 |
| २. | शिक्षणाचे प्रगत मानसशास्त्र (Advanced Psychology of Education) - 4 Credit | EDU506 |
| ३. | मूल्यमापन आणि मूल्यनिर्धारण-नवीन दृष्टीकोन (Assessment & Evaluation-New Approach) - 4 Credit | EDU507 |
| ४. | शिक्षणशास्त्र मूलभूत (Basics of Education) - 2 Credit | EDU508 |
| ५. | **Elective** | |
| | शैक्षणिक नियोजन (Educational planning) - 4 Credit | EDU509 |

| | | |
|---|---|---|
| | **किंवा** | |
| | शैक्षणिक मार्गदर्शन आणि समुपदेशन (Educational guidance and counseling) - 4 Credit | EDU510 |
| ६. | **RM** | |
| | शैक्षणिक संशोधनाचे अधिष्ठान (Foundation of Educational Research) - 4 Credit | EDU599 |
| | **सत्र - २ (SEM - II) (Mandatory)** | |
| १. | प्रगत शैक्षणिक समाजशास्त्र (Advanced Educational Sociology) - 4 Credit | EDU543 |
| २. | अध्ययनकर्त्याचे मानसशास्त्र (Learner's Psychology) - 4 Credit | EDU544 |
| ३. | समावेशित शिक्षण (Inclusive Education) - 4 Credit | EDU545 |
| ४. | ग्रंथालय आणि ई-ग्रंथालय (Library and e-Library) - 2 Credit | EDU546 |
| ५. | **Elective** | |
| | शैक्षणिक व्यवस्थापन, प्रशासन व नेतृत्व (Educational Management, Administration and Leadership) - 4 Credit | EDU547 |
| | **किंवा** | |
| | विशेष गरजा असणाऱ्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन (Mentoring special problem students) - 4 Credit | EDU548 |
| ६. | अध्यापन विषयक क्षेत्रीय कार्य (Teaching Related Field Work) - 2 Credit | EDU549 |
| ७. | आंतरवासिता (Internship) - 2 Credit | EDU550 |
| | **सत्र - ३ (SEM - III) (Mandatory)** | |
| १. | सामग्री विश्लेषण आणि अहवाल लेखन (Data analysis and report writing) - 2 Credit | EDU600 |
| २. | अध्यापक शिक्षण (Teacher Education) - 4 Credit | EDU601 |
| ३. | अध्यापनशास्त्र,प्रौढ अध्यापनशास्त्र आणि स्वयं निर्देशित अध्ययन (Pedagogy, Andragogy and Self-Directed Learning) - 4 Credit | EDU602 |
| ४. | शिक्षणातील माहिती संप्रेषण तंत्रविज्ञान (Information Communication Technology in Education) - 4 Credit | EDU603 |
| ५. | **Elective** | |
| | विज्ञान शिक्षण (Science education) - 4 Credit | EDU604 |
| | **किंवा** | |
| | भाषा शिक्षण (Language learning) - 4 Credit | EDU605 |
| ६. | संशोधन अहवाल कृती - 4 Credit | EDU606 |

| सत्र - ४ (SEM - IV) (Mandatory) | | |
|---|---|---|
| १. | मुक्त व दूरस्थ अध्ययन (Open and distance learning) | EDU607 |
| २. | जीवन कौशल्ये (Life Skills) | EDU608 |
| ३. | शैक्षणिक उद्योजकता (Educational entrepreneurship) | EDU609 |
| ४. | **Elective** | |
| | पर्यावरण शिक्षण (Environmental Education) | EDU610 |
| | **किंवा** | |
| | मानवी हक्क (Human rights) | EDU611 |
| | **किंवा** | |
| | Open Course | EDU612 |
| ५. | संशोधन अहवाल कृती - 6 Credit | EDU613 |

## ५. मूल्यमापन प्रक्रिया

१) श्रेयांकानुसार गुणविभागणी पुढीलप्रमाणे करण्यात आलेली आहे.

१०.१) २ श्रेयांकासाठी ५० गुण

१०.२) ४ श्रेयांकासाठी १०० गुण

१०.३) ६ श्रेयांकासाठी १५० गुण

२) एम.ए. शिक्षणशास्त्र शिक्षणक्रमाच्या विविध कृतींचे मूल्यमापन भारांश पुढीलप्रमाणे ठेवण्यात आलेला आहे.

| क्र. | कार्य | अंतर्गत | बहिस्थ |
|---|---|---|---|
| ११.१ | तात्विक अभ्यासक्रम (Theory Courses) **RM सह** | ३०% | ७०% |
| ११.२ | प्रात्यक्षिक कार्य (Practical Work) | ५०% | ५०% |
| ११.३ | संशोधन प्रकल्प (Research Project) | ५०% | ५०% |
| ११.४ | क्षेत्रीय कार्य (Field Project) | ५०% | ५०% |
| ११.५ | On Job Training | ५०% | ५०% |
| ११.६ | MOOC | ३०% | ७०% |

३) विद्यार्थ्यांचे मूल्यमापन दोन प्रकारे करण्यात येईल.

(अ) अंतर्गत (निरंतर) मूल्यमापन

(आ) अंतिम परीक्षा

(१) लेखी परीक्षा

(२) लघू शोधप्रबंध मूल्यमापन

(३) क्षेत्रीय कार्य मूल्यमापन
(४) आंतरवासिता मूल्यमापन
(५) मौखिक परीक्षा

**अ) अंतर्गत मूल्यमापन**

अंतर्गत मूल्यमापन पुढील साधनांद्वारे करण्यात येईल वर्गचाचणी (Class Test), स्वाध्याय (Assignment), नोंद पुस्तिका (Record Book), परिसंवाद (Seminar), व्यष्टी अभ्यास (Case Study), प्रश्नमंजुषा (Quiz) अभ्यासक्रमाच्या गरजेनुसार त्यात बदल होतील. शिक्षणक्रमाच्या गरजेनुसार इतरही साधनांचा वापर करावा.

**आ) लेखी परीक्षा**

लेखी परीक्षा ही सत्र पद्धतीने (सेमिस्टर) घेण्यात येईल. त्यामुळे वर्षातून २ वेळा म्हणजेच २ वर्षातून ४ वेळा दर सहा महिन्यांनी लेखी परीक्षा घेण्यात येईल. लेखी परीक्षेसाठी ७० गुणांची परीक्षा असेल. अंतिम परीक्षेच्या प्रश्नपत्रिका दीर्घ (Essay), लघु उत्तरे (Short Answer), गुणात्मक प्रश्न (Quantitative Problems), वस्तुनिष्ठ प्रश्न (Objective type) अशा स्वरूपाची असेल.

- अंतिम परीक्षेची गुण विभागणी खालीलप्रमाणे असते.
- अंतिम परीक्षा एकूण ८० गुणांची असेल. सर्व अभ्यासक्रमांच्या प्रश्नपत्रिका मराठीत आणि इंग्रजीत राहतील. ह्या शिक्षणक्रमाचे माध्यम मराठी असल्याने ज्यांना उत्तरे अथवा लघुशोधप्रबंध इंग्रजीतून किंवा हिंदीतून लिहावयाचे असतील त्यांना तशी पूर्वपरवानगी घ्यावी लागेल.
- उत्तरपत्रिकांची तपासणी केंद्रीय पद्धतीने संबंधित अभ्यासक्रमांच्या तज्ज्ञ प्राध्यापकांच्या साहाय्याने केली जाईल.

**परीक्षा दरवर्षी नोव्हेंबर / डिसेंबर आणि मे / जून या महिन्यांमध्ये होईल. परीक्षा अर्ज परीक्षेपूर्वी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध होतील. त्याबाबतची सूचना विद्यापीठाच्या वेबसाईटवर असेल.**

**इ)** एखाद्या विषयात अनुत्तीर्ण झाल्यास त्या विषयाच्या पुनर्परीक्षेसाठी किंवा संशोधन अहवाल अपूर्ण असल्यास Online Repeater अर्ज भरावा व विद्यापीठाने वेळोवेळी निर्धारीत केलेल्या शुल्काप्रमाणे शुल्क भरावे.

**ई)** Repeater विद्यार्थ्यांने ऑनलाईन परीक्षेचा अर्ज शिक्षणक्रमातील कोणतीही कृती अपूर्ण असल्यास भरावा लागेल. आवश्यक आहे, अन्यथा निकाल लागणार नाही.

**उ)** विद्यापीठाच्या वेबसाईटवर परीक्षेविषयीची सर्व माहिती, सूचना, परीपत्रके ही 'Examination' ह्या वर जाऊन वेळोवेळी पाहाव्यात.

**लघूशोधनिबंध परीक्षा**

१) अभ्यासकेंद्रावर लघूशोधनिबंध जमा करण्याची संधी वर्षातून दोनदा असते. लघूशोधनिबंधाचे अहवालाचे मूल्यमापन व मौखिक परीक्षा अभ्यासकेंद्रावरच घेण्यात येते ही परीक्षा वर्षातून दोनदा घेतली जाते.

२) लघू शोधप्रबंधाचे परीक्षण दोन परीक्षक करतील (एक बहिस्थ परीक्षक व एक अंतर्गत परीक्षक) लेखी अहवाल मूल्यमापनाव्यतिरिक्त मौखिक परीक्षाही असेल.

**उत्तीर्णतेचे नियम**

(१) प्रत्येक अभ्यासक्रमाच्या अंतिम लेखी परीक्षा व स्वाध्याय यामध्ये प्रत्येकी किमान ४०% गुण मिळविणे अनिवार्य आहे.

(२) लघु शोधप्रबंध उत्तीर्ण होण्यासाठी किमान ५०% गुण मिळविणे अनिवार्य आहे. तसेच मौखिक परीक्षेत ५०% गुण मिळविणे अनिवार्य आहे.

(३) क्षेत्रीय कार्य आणि आंतरवासिता यात किमान ५०% गुण प्राप्त करणे अनिवार्य आहे.

(४)संपूर्ण शिक्षणक्रम यशस्वीरित्या पूर्ण करण्यासाठी किमान ५०% गुण मिळविणे अनिवार्य आहे.

**परिशीलन समिती (Revaluation Committee) :** सर्व एम.ए. शिक्षणशास्त्र अभ्यासकेंद्रांवर संशोधन अहवाल मूल्यमापन व मौखिक परीक्षा झाल्यानंतर सर्व अहवालांचे विद्यापीठात एकत्रितरित्या परिशीलन समितीकडून परिशीलन करण्याबाबतचा निर्णय विद्यापीठाच्या वैधानिक परिषद /समित्याद्वारे मान्य केलेल्या जाते. त्यानंतर विद्यार्थ्यांचा अंतिम निकाल जाहीर केला जाईल.

मूल्यमापनाबाबतची सविस्तर माहिती तुम्हाला अभ्यासकेंद्रावर मिळेल.

**अंतिम परीक्षेसाठी पात्रतेच्या अटी**

(१) शिक्षणक्रमाच्या सर्व संपर्कसत्रांना उपस्थित राहून सर्व अंतर्गत कार्य पूर्ण केल्याबद्दलचे अभ्यासकेंद्र-प्रमुखांचे प्रमाणपत्र विद्यार्थ्याने घेतले पाहिजे.

(२) प्रत्येक सत्रातील (Semester) संपर्कसत्रांत ८०% उपस्थिती अनिवार्य आहे.

(३) काही अपरिहार्य कारणास्तव विद्यार्थ्यची ८०% उपस्थिती नसल्यास विद्यापीठाच्या वैधानिक सामित्याद्वारे निश्चित करण्यात आलेले शुल्क भरून विद्यार्थ्याला त्या त्या सत्रातील कृती पूर्ण कराव्या लागतील.

(४) क्षेत्रीय कार्य आणि आंतरवासिता हे प्रात्यक्षिक कार्य पूर्ण असणे अनिवार्य आहे.

## ६. संकीर्ण माहिती / सूचना

एम.ए. शिक्षणशास्त्र शिक्षणक्रमास प्रवेश घेतल्यानंतर खालील विशेष बाबी लक्षात ठेवाव्यात.

१. एकदा प्रवेश घेतल्यानंतर कोणत्याही कारणास्तव प्रवेश रद्द केल्यास शुल्काची रक्कम परत केली जाणार नाही या या संदर्भातील पत्रव्यवहाराची दखल घेतली जाणार नाही. तथापि, शिक्षणक्रम सुरू असताना प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्याचे निधन झाल्यास त्यापुढील आवश्यक कागद- पत्रांची त्याच्या वारसाने पूर्तता केल्यास प्रशासकीय खर्च वजा करून ७५% शुल्क परत करण्यात येईल. शुल्क परत करताना (१) मृत्यूच्या प्रमाणपत्राची सत्यप्रत (२) रु. २० च्या स्टँपपेपरवर कार्यकारी दंडाधिकारी यांच्या समक्ष प्रमाणित केलेले वारसाचे ना हरकत दर्शविणारे मूळ शपथपत्र (३) शुल्क भरल्याची मूळ पावती (४) अध्ययन साहित्य. विद्यापीठास सादर करावे लागेल.

२. विद्यापीठास पत्र पाठविताना कायम नोंदणी क्रमांक व तुकडीचा, अभ्यास- केंद्राचे नाव व संकेतांक यांचा उल्लेख नमूद करणे आवश्यक आहे.

३. विद्यार्थ्यास विद्यापीठाने माहितीपुस्तिकेत नमूद केलेल्या अटी व शर्ती प्रवेशासाठी लागू राहतीलच, परंतु या व्यतिरिक्त विद्यापीठाने वेळोवेळी तयार केलेले नियमही बंधनकारक राहतील.

४. NEP 2020 च्या मार्गदर्शक तत्त्वानुसार विद्यार्थ्याने पदव्युत्तर पदवीतील प्रथम वर्षातीला सर्व कृती यशस्वीरीत्या पूर्ण केल्यानंतर त्याला बाहेर पडावयाचे असल्यास त्याला शिक्षणशस्त्र पदव्युत्तर पदविका देण्यात येईल त्याचा संकेतांक PGD8EDU Post Graduate Diploma in Education असा असेल.

**संपर्कसत्रे उपस्थिती माहिती**

मुक्त विद्यापीठाचा शिक्षणक्रम प्राधान्याने स्वयं-अध्ययनावर आधारित असला तरी हा व्यावसायिक शिक्षणक्रम असल्यामुळे संमंत्रण, स्वाध्याय सादरीकरण, संशोधन मार्गदर्शन, कृतिसत्रे आणि परिसंवाद, इत्यादींसाठी संपर्कसत्रांची आवश्यकता असते. संपर्कसत्रातील उपस्थिती व सहभाग हा अत्यावश्यक व अनिवार्य आहे. संपर्कसत्रांचे आयोजन सामान्यतः सुट्यांमध्ये केले जाते. सुट्यांव्यतिरिक्त छोट्या संपर्कसत्रांचे आयोजन अभ्यासकेंद्राने केल्यास अशा संपर्कसत्रांसाठी विद्यार्थ्यांना सेवेतून रजा घेऊन उपस्थित राहावेच लागेल. त्याबद्दल कोणतीही तक्रार विद्यापीठ मान्य करणार नाही.

दोन वर्षांत एकूण 30 दिवसांचे संपर्कसत्र घेण्यात येईल. त्यातील 2 दिवसांचे उद्बोधन सत्र व उर्वरित 28 दिवसांचे संपर्कसत्र अभ्यास-केंद्रावर घेण्यात येईल. संपर्कसत्राबाबतचा सविस्तर तपशील अभ्यास-केंद्रामार्फत देण्यात येईल. विद्यार्थी मार्गदर्शिकेतही देण्यात येईल.

**सेवानिहाय शुल्क**

सेवानिहाय शुल्कविद्यापीठाच्या नवीन धोरणानुसार सेवानिहाय शुल्क आकारणी झालेली आहे. परीक्षा, गुणपत्रक, उत्तरपत्रिकांचे पुनर्मूल्यांकन यांसारख्या बाबींचा त्यात समावेश आहे. सदर शुल्क खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | सेवेचा प्रकार | सुधारित शुल्क टपाल खर्चासह |
|---|---|---|
| (१) | स्थलांतरित दाखला (Migration Certificate) | ४०० |
| (२) | दुय्यम गुणपत्रक (Duplicate Statement of Marks) | ६०० |
| (३) | दुय्यम दीक्षान्त प्रमाणपत्र (Dulpicate Convocation Certificate) | ४०० |
| (४) | छायांकित / स्कॅन प्रत फक्त / उत्तर पत्रिकेची स्कॅन प्रत ई-मेलद्वारे (Photocopy/Scan copy of Answer sheets per copy by e-mail only) | ३०० |
| (५) | प्रति विषयाच्या उत्तर पत्रिकांचे पुनर्मूल्यांकन (Revaluation of Answer Book per Subject) | ५०० |
| (६) | उतारा प्रमाणपत्र (Trascript Certificate) | |
| | (अ) प्रथम प्रत भारतांतर्गत (First copy Delivery in India) | १८५० |
| | (आ) भारताबाहेरील (For outside India) | २८०० |
| | (इ) प्रत्येक अतिरिक्त प्रतीसाठी (For every additional copy) | ४०० |
| (७) | गुणपत्रकाचे प्रमाणन (Attestation of Marksheet) | ४०० |

| | | |
|---|---|---|
| (८) | शैक्षणिक कागदपत्रांची पडताळणी (Verification of Educational Documents) | ४०० |
| (९) | पुनर्परीक्षार्थी विद्यार्थी परीक्षा शुल्क (Repeater Student Exam. fees Dipl./UG) | १३० प्रती अभ्यासक्रम |
| (१०) | विद्यार्थी परीक्षा शुल्क पीजी/टेक/ व्यावसायिक (Repeater Student Exam. fees PG/Tech/Professional) | १५० प्रती अभ्यासक्रम |
| (११) | पुनर्परीक्षार्थी विद्यार्थ्यांचे गुणपत्रक (Repeater Student Statement of Marks) | १०० प्रती गुणपत्रक |

**(टीप: विद्यापीठाच्या धोरणात्मक निर्णयानुसार शुल्कात बदल होऊ शकतात.)**

## संपर्कासाठी पत्ते

**(१) माहितीपुस्तिका**

विद्यापीठाच्या संकेतस्थळावरून डाऊनलोड करावी.
http://ycmou.digitaluniversity.ac

**(२) अभ्यासक्रमातील शैक्षणिक अडचणी**

डॉ. संजीवनी महाले
संचालक, शिक्षणशास्त्र विद्याशाखा
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ
ज्ञानगंगोत्री, गंगापूर धरणाजवळ,
नाशिक 422 222
फोन : (0253) 2231714/15, 2231472

**(३) शिक्षणक्रम विकसन समन्वयक**

डॉ. संजीवनी महाले/श्रीम. स्नेहल मांजरेकर
शिक्षणशास्त्र विद्याशाखा
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ
ज्ञानगंगोत्री, गंगापूर धरणाजवळ,
नाशिक 422 222
दूरध्वनी : (0253) 2231714
विस्तार : 3004

**(४) नोंदणी कक्ष**

श्री. मनोज घंटे
सहायक कुलसचिव
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ
ज्ञानगंगोत्री, गंगापूर धरणाजवळ,
नाशिक 422 222
दूरध्वनी : (0253) 2231715/2230580

**(५) पुस्तके, अध्ययन-साहित्य बाबत**

श्री. गणेश चव्हाण,
कक्ष अधिकारी,
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ
ज्ञानगंगोत्री, गंगापूर धरणाजवळ,
नाशिक 422 222
दूरध्वनी : (0253) 2230107

**(६) परीक्षा अर्ज, परीक्षा क्रमांक, निकाल, पदवी प्रमाणपत्र बाबत**

डॉ. चंद्रकांत पवार
उपकुलसचिव, परीक्षा कक्ष-1
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ
ज्ञानगंगोत्री, गंगापूर धरणाजवळ,
नाशिक 422 222
दूरध्वनी : (0253) 2230716

**महत्त्वाचे** : विद्यापीठाशी करावयाचा सर्व पत्रव्यवहार पोस्टाने अथवा स्पीड पोस्टानेच करावा. खाजगी कुरीअरमार्फत करू नये. शक्यतो आपल्या अडचणी ह्या अभ्यासकेंद्रावरील केंद्र-समन्वयकांशी चर्चा करून सोडवाव्यात. केंद्रसमन्वयकाने आवश्यकता वाटल्यास शिक्षणक्रम समन्वयकाकडे संपर्क साधावा.

तुम्हाला येणाऱ्या अडचणींचे निराकरण करण्यासाठी आवश्यक माहिती व मदत विद्यापीठाच्या संकेतस्थळावर
'Presentation' ह्या पेजला भेट द्या.
http://ycmou.digitaluniversity.ac/content.aspx? ID=26784 ह्या वेबसाईटवर सतत संपर्कात राहा.

राज्यातील खाजगी माध्यमिक शाळांतील शिक्षकांना निवडश्रेणीसाठी अर्हता निश्चित करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन शुध्दीपत्रक क्रमांकः संकीर्ण-२०१५/(प्र.क्र.३१)/टीएनटी-१
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
तारीख: १५ जुलै, २०१६

वाचा - शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्रमांक - पीआरई २००२/ ३३९५/ प्राशि-१ दि.२७.२.२००३

शासन शुध्दीपत्रक -

राज्यातील खाजगी माध्यमिक शाळांतील शिक्षकांना निवडश्रेणी अर्हता निश्चित करण्याबाबत पारित करण्यात आलेल्या संदर्भाधीन शासन निर्णय, दि. १ डिसेंबर, १९९९ मधील खालील परिच्छेद - २

"इतर विषयांच्या शिक्षकांना "शिक्षकाच्या अध्यापनाच्या विषयाची पदव्युत्तर पदवी किंवा तत्सम अर्हता" तसेच " ज्या अध्यापनाच्या विषयाची पदव्युत्तर पदवी बहिस्थ:रित्या संपादन करणे शक्य नसेल त्या ठिकाणी एम. एड. ही पदवी" ग्राहय धरण्यात यावी."

या ऐवजी

"शिक्षकाच्या शैक्षणिक अर्हतेबाबत इतर विषयाच्या शिक्षकांना "शिक्षकाच्या अध्यापनाच्या विषयाची पदव्युत्तर पदवी किंवा ज्या अध्यापनाच्या विषयाची पदव्युत्तर पदवी नियमितरित्या संपादन करणे शक्य नसल्यास त्या ठिकाणी बहिस्थ: रित्या प्राप्त केलेल्या त्या विषयातील पदव्युत्तर पदवी अथवा एम.एड. ही पदव्युत्तर पदवी ग्राह्य धरण्यात यावी," तसेच एम.ए. (एज्युकेशन) ही पदवी राष्ट्रीय शिक्षक शिक्षण परिषद ( N.C.T.E. ) च्या दि. २८.११.२०१४ च्या अधिसूचनेनुसार एम.एड. पदवी समकक्ष समजण्यात यावी." असे वाचण्यात यावे.

सदर शासन शुध्दीपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१६०७१६१५०६२१८४२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Rajendra Shankarrao Pawar

Digitally signed by Rajendra Shankarrao Pawar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=School Education Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=679184b88f7019ef64ad6ddc2495ca280267c0d475 5ce63fa70c45cf755d9373, cn=Rajendra Shankarrao Pawar
Date: 2016.07.16 15:11:02 +05'30'

( राजेंद्र पवार )
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,

२) मा. मंत्री ( शालेय शिक्षण )